# राज्यातील उजनीसह सात जलविद्युत प्रकल्पांचे खासगीकरण

## आता सरकारी गुंतवणूक नाही | ५०७ कोटी महसूल मिळण्याची अपेक्षा

सोलापूर/प्रतिनिधी

बांधकाम होऊन ३५ वर्षे पूर्ण झालेले राज्यातील सात जलविद्युत प्रकल्प २५ वर्षांसाठी चालविण्यासाठी खासगी कंपन्यांनाही चालवायला दिले जाणार आहेत. जलसंपदा विभागाने मांडलेल्या प्रस्तावाला राज्य मंत्रिमंडळाची नुकतीच मंजुरी मिळाली आहे.त्यात सोलापूर जिल्ह्यातील उजनीसह ७ वीज प्रकल्पांचा समावेश आहे.

या माध्यमातून पैठण, उजनी, पवना, भातसा यासारख्या एकूण सात जलविद्युत प्रकल्पांच्या नूतनीकरण, आधुनिकीकरणासाठी निविदा मागविण्यात येणार आहेत. या प्रकल्पांमध्ये यापुढे राज्य सरकारकडून कोणतीही भांडवली गुंतवणूक केली जाणार नसून, निविदेच्या आणि त्यानंतर विविध माध्यमांतून सरकारला दर वर्षी ५०७ कोटी रुपयांचा महसूल मि ळेल,असा सरकारचा दावा आहे.

राज्यात जलविद्युत प्रकल्पांची उभारणी जलसंपदा विभागामार्फत करण्यात येते. या प्रकल्पांची उभारणी केल्यानंतर भाडेपट्टी तत्वावर त्याचे परिचलन व देखभाल 'म हाजनको'तर्फे करण्यासाठी हस्तांतरित करण्यात येते. सद्यस्थितीत जलसंपदा विभागामार्फत बांधून हस्तांतरित केलेल्या २५ जलविद्युत प्रकल्पांपैकी काही प्रकल्पांचे ३५ वर्षांचे विहित आयुर्मान पूर्ण झाले आहे. तरी नूतनीकरण, आधुनिकीकरणाद्वारे त्यांच्यात क्षमतावाढ करता येणे शक्य आहे. महानिर्मिती कंपनीकडून नूतनीकरण व आधुनिकीकरण करण्यासाठी राज्यातील प्रकल्पांचे दोन श्रेणींमध्ये वर्गीकरण करण्यात आले आहे. ज्या प्रकल्पांमध्ये पाण्याचा वापर केवळ वीजनिर्मितीसाठी आहे, असे प्रकल्प 'श्रेणी-१' तर ज्या प्रकल्पांमध्ये पाण्याचा वापर वीजनिर्मितीसह सिंचन, औद्योगिक वापर आदींसाठी होत असणारे 'श्रेणी-२' प्रकारात करण्यात आले आहेत. 'श्रेणी-१'मधील प्रकल्पांचे नूतनीकरण व आधुनिकीकरण केवळ महानिर्मितीद्वारे करण्यात येणार असून, नव्या धोरणानुसार, 'श्रेणी-२'मधील प्रकल्पांच्या नूतनीकरण व आधुनिकीकरणासाठी निविदा काढण्यात येणार आहेत. यात राज्य सरकारच्या म



हानिर्मिती कंपनीलाही सहभागी होता येईल. मात्र, त्यांना खासगी कंपन्यांशी स्पर्धा करावी लागेल. हे प्रकल्प २५ वर्षांसाठी खासगी कंपन्या चालवू शकतील, त्यानंतर ते जलसंपदा विभागाकडे हस्तांतरित करावे लागतील.

याच धर्तीवर येलदरी (२२.५ म ेगावॉट), भाटघर (१६ मेगावॉट), पैठण (१२ मेगावॉट) पवना (१० मेगावॉट), खडकवासला (८ अधिक ८ मेगावॉट), उजनी (१२ मेगावॉट) आणि भातसा (१५ मेगावॉट) अशा सहा जलविद्युत प्रकल्पांचे खासगीकरणातून नूतनीकरण करण्याचे धोरण मंत्रिमंडळापुढे मांडण्यात आले. या प्रकल्पांची वीजनिर्मितीची एकूण क्षमता १६७.४५ मेगावॉट इतकी आहे.

खासगी कंपन्यांना हे प्रकल्प हस्तांतरित करण्यात आल्यानंतर थ्रेशोल्ड प्रीमियम, अपफ्रंट प्रीमियम, १३ टक्के मोफत वीज, भाडेपट्टी व इन्टेक मेन्टेनन्स शुल्क इत्यादी स्वरूपात सरकारला दर वर्षी ५०७ कोटी रुपयांचा महसूल उपलब्ध होणार आहे. याआधी सातारा येथील वीर धरण खासगी कंपनीला हस्तांतरित करण्यात आले असून, जून २०२२ पासून महती हायड्रो पॉवर वीर प्रोजेक्ट त्याचे परिचालन करत आहे.

### २५ वर्षांनंतर हस्तांतर

राज्य सरकारने या प्रकल्पांसाठी नूतनीकरण, आधुनिकीकरण, क्षमतावाढ व आयुर्मानवृद्धी (एलआरओटी) धोरण तयार केले असून, ते नुकत्याच झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत मांडण्यात आले होते. बैठकीत या धोरणाला मंजुरी मिळाली असून, या माध्यमातून राज्यातील सहा जलविद्युत प्रकल्प निविदेमार्फत चालविण्यासाठी देण्यात येणार आहेत. खासगी कंपन्यांकडे हा प्रकल्प हस्तांतरित झाल्यानंतर त्यांची इच्छा असल्यास तिथे सौर प्रकल्पही सुरू करण्याची परवानगी असेल त्याविषयी वेगळी मंजुरी मुख्य अभियंता (विद्युत) यांच्याकडून घ्यावी लागेल. मात्र, २५ वर्षांचा करार कालावधी पूर्ण झाल्यावर जलविद्युत प्रकल्प आणि सौर प्रकल्प जलसंपदा विभागाकडे हस्तांतरित करण्यात येईल.

### आणखी सहा प्रकल्पांचाही विचार

यवतेश्वर, करंजवाण, शहानूर, डोलवहाळ, माजलगाव आणि वाण या एकूण ९.५७ मेगावॉट क्षमता असलेले सहा प्रकल्पांचे ३५ वर्षांचे नियत आयुर्मान पूर्ण झालेले नसले, तरी त्याांतील विद्युत घटकांची दुरुस्तीकामे आवश्यक असल्याने त्याांचीही खासगी कंपन्यांकडून एलआरओटी तत्त्वावर सुरू ठेवण्याचा मानस राज्य सरकारचा आहे.

## संक्षिप्त वृत्त

### खर्डी येथे कोयत्याने मारहाण; पती-पत्नी विरुद्ध गुन्हा

**पंढरपूर :** भावकीतील शेत जमिनीच्या बांधातून कोयता आणि काठीने केलेल्या मारहाणीत महिला आणि त्याचा मुलगा असे दोघेजण जखमी झाले . ही घटना खर्डी (ता . पंढरपूर) येथे शुक्रवारी सकाळच्या सुमारास घडली. ललिता मोहन जाधव (वय ४०) आणि त्यांचा मुलगा कार्तिक जाधव (वय २० रा. खर्डी) अशी जखमीची नावे आहेत . त्यांना मारहाण केल्याप्रकरणी गुरुप्रसाद शिवाजी जाधव आणि त्याची पत्नी इंदुबाई जाधव (रा. खर्डी) या दाम्पत्याविरुद्ध पंढरपूर तालुक्याच्या पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. शुक्रवारी सकाळी ९ वाजेच्या सुमारास तू आमचा समाईक बांध का फोडला ? अशी विचारणा केली असता गुरुप्रसाद जाधव याने ललिता यांच्या हातावर कोयत्याने मारले. तर त्याची पत्नी इंदुबाई हिने कार्तिक याला हात आणि काठीने मारहाण केली . अशी नोंद पोलिसात झाली . हवालदार बनसोडे पुढील तपास करीत आहेत.

### चळे येथील अपघातात सहा वर्षाचा मुलगा ठार

**पंढरपूर :** सिमेंट कालवण्याचा मिक्सर रिव्हर्स घेताना झालेल्या अपघातामध्ये ट्युशनला जाणारा सायकलवरील ६ वर्षाचा मुलगा गंभीर जखमी होऊन मरण पावला . हा अपघात चळे (ता.पंढरपूर ) येथे शुक्रवारी दुपारच्या सुमारास घडला. अपघातानंतर मिक्सरचा चालक फरार झाला आहे . निहार उर्फ वैभव नंदकुमार सटाणे (वय ६ वर्षे रा.चळे ता.पंढरपूर) असे मयताचे नाव आहे. तो काल दुपारी तीन वाजेच्या सुमारास सायकल वरून ट्युशनला निघाला होता. त्यावेळी त्याच्या घरासमोरून रिव्हर्स येणारा एमएच४२-बीई-५६५२ या क्रमांकाचा मिक्सर पाठीमागून धडकल्याने सायकलवरील निहार उर्फ भैरव सटाणे हा मुलगा गंभीर जखमी होऊन उपचारापूर्वी मयत झाला. या अपघाताचीफिर्याद मयताचे चुलते आनंदा बापू सटाले (रा.चळे) यांनी पंढरपूर तालुका पोलिसात दाखल केली. हवालदार शिंदे पुढील तपास करीत आहेत.

### मारहाण करुन उपाशी ठेवत विवाहितेचा छळ; गुन्हा दाखल

**सोलापूर :** विवाहितेला घालून पाडून बोलून तू काही काम धंदा करत नाही,घरात बसून खाते असे म्हणत शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर उपाशी ठेवून शारीरिक व मानसिक त्रास देत छळ केल्याप्रकरणी पतीसह पाचजणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सन २०१६ ते २६ मे २०२४ पर्यंत फिर्यादी यांच्या सासरी घडली. याबाबत नौशाद गालिब शेख (रा.शिवगंगा नगर भाग २, नई जिंदगी) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात दिली आहे. त्यांच्या फिर्यादीवरून पती गालिब शेख, सासू जुबेदाबी शेख,दिर मेहदाब शेख,जाऊ मेहबुबी शेख,नणंद शमशाद यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेड कॉन्स्टेबल भांगे हे करीत आहेत.

### विनापरवाना म्हशी पळवल्या; दोघांवर गुन्हा दाखल

**सोलापूर :** विनापरवाना म्हशी पळवण्याचा कार्यक्रम घेऊन म्हशीस क्रूरपणे वागणूक देत लोकांच्या जीविका धोका निर्माण केल्याप्रकरणी दोन जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २८ जुलै रोजी दुपारी पाच ते सायंकाळी सात दरम्यान भुसार गल्ली येथे घडली.याप्रकरणी पो.हे.कॉ. आसिफ मौला शेख (नेमणूक जेलरोड पोलीस ठाणे) यांनी जेलरोड पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून किशोर ज्ञानेश्वर सरवदे (रा. जोशी गल्ली,रविवार पेठ) व म्हशीचे मालक (नाव पत्ता म हीत नाही) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल सय्यद हे करीत आहे.

### शेळगी परिसरातून दुचाकी पळवल्या

**सोलापूर :** शहरात १ ते २ ऑगस्ट च्या दरम्यान शेळगी परिसरातून दोन दुचाकी चोरट्यांनी पळवल्या. प्रमोद मधुकर बागेवाडीकर (वय-५०,रा.शेळगी) यांची विद्यानगर शेळगी येथील घरासमोर पार्क करून ठेवलेली दुचाकी (क्रमांक एम एच.१३सीई.८५४६) अज्ञात च पळवली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो. हे.कॉ. आरेनवरून हे करीत आहेत. दुसऱ्या घटनेत संतोष बाबुराव मामाने (वय-४८,रा.अंजनी निवास विद्यानगर,शेळगी) यांची दुचाकी (क्र. एमएच.१३.सीएल.३६०९) चोरट्याने पळवली. याप्रकरणी जोडभावी पेठ पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. तपास पो.हे. शिवशरण हे करीत आहे.

## विसर्ग पुन्हा वाढला

सोलापूर/प्रतिनिधी

उजनी धरणात दौंडमधून येणारा विसर्ग शनिवारी सायंकाळपासून पुन्हा वाढला आहे. त्यामुळे येत्या आठवडाभरात किंवा त्या अगोदर उजनीतील पाण्याच्या पातळीचे शतक पूर्ण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. शुक्रवारी सायंकाळी ६ वाजता ३१ हजार क्युसेकचा विसर्ग होता.शनिवारी सकाळी तो ५२ हजार क्युसेक झाला. सायंकाळी मात्र त्यात मोठी वाढ झाली.६ वाजण्याच्या दरम्यान दौंडमधून ६८ हजार क्युसेकचा विसर्ग धरणात येवून मिसळत होता.धरणातील पाण्याची पातळी ७७ टक्के झाली आहे.

रविवारी सकाळी ८० टक्क्यांच्या पुढे जाईल,असे सांगण्यात आले.पाण्याची पातळी ऐंशी टक्के झाल्यानंतर विसर्ग वाढत राहिला तर उजनीमधून भीमा नदीत पाणी सोडण्याचा विचार होवू शकतो




### चार धरणांमधून विसर्ग वाढवला

खडकवासला, पवना, मुळशी, चासकम ान धरणांच्या पाणलोट क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर अतिवृष्टी होत असून धरणे पूर्ण क्षमतेने भरल्याने या धरणातून मोठ्या प्रमाणावर विसर्ग सुरु करण्यात आला आहे. भारतीय हवामान खात्याने पुणे आणि सातारा जिल्ह्यांसाठी अतिवृष्टीचा 'रेड अलर्ट' जारी केला आहे.

## जि.प. च्या २४ शिक्षकांची मंगळवारी समुपदेश प्रक्रिया



सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षण विभागाने पहिल्या टप्प्यातील शिक्षकांची नियुक्ती केली. मात्र दुसरा टप्पा मध्ये नव्याने घेण्यात आलेल्या २४ शिक्षकांची समुपदेशन प्रक्रिया थांबविण्यात आली होती ती प्रक्रिया दिनांक ६ ऑगस्ट रोजी पार पडणार आहे, अशी माहिती शिक्षण विभागाकडून देण्यात आली आहे.

पहिल्या टप्प्यातील ११ अनुसुचित जमाती उमेदवारांना नुकतीच नियुक्ती देण्यात आली. मात्र दुसरा टप्प्यातील तब्बल २४ शिक्षकांना थांबविण्यात आले होते. याची पूर्तता ४ जुलै रोजी करण्यात आली होती. आता ती तपासणी पूर्ण होऊन आता समुपदेशन प्रक्रिया सुरू येणार आहे. येत्या ६ ऑगस्ट रोजी सकाळी जवाहरलाल नेहरू वस्तीगृह याठिकाणी समुपदेशन प्रक्रिया पार पाडली जाणार आहे. पवित्र पोर्टलच्या पहिल्या टप्प्यातून सोलापूर जिल्हा परिषदेला २७३ शिक्षक मिळाले आहेत. त्यातील पात्र उमेदवारांची नियुक्ती केली आहे. आता नव्याने आलेल्या २४ शिक्षकांच्या कागदपत्रांची तपासणी सुद्धा झाली असून आता समुपदेशन नंतर नियुक्त देण्याचे बाकी असल्याचे प्राथमिक शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.



### आतापर्यंत २५० शिक्षक मिळाले

जिल्हा परिषदेच्या शाळेत जवळपास ५५० शिक्षकांच्या जागा रिक्त आहेत. पवित्र पोर्टलच्या पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील मिळून एकूण पात्र २५० शिक्षक मिळाले आहेत. त्यामुळे जिल्ह्यातील अनेक प्राथमिक शाळांना गुरुजी मिळालेल्या आहेत. त्यामुळे त्या शाळांची गुणवत्ता वाढण्यास मदत होत आहे.

## जि.प.च्या १९ संवर्गावर होणारा अन्याय दूर करण्याची मागणी

सोलापूर/प्रतिनिधी

राज्य जिल्हा परिषद कर्मचारी युनियनच्यावतीने गेल्या अनेक वर्षांपासून कनिष्ठ सहायक, वरिष्ठ सहाय्यक, कनिष्ठ प्रशासनाधिकारी, सहाय्यक प्रशासनाधिकारी, कनिष्ठ सहाय्यक लेखा, वरिष्ठ सहाय्यक लेखा, कनिष्ठ लेखाधिकारी, सहाय्यक लेखाधिकारी, परिचर, वाहन चालक, अंगणवाडी पर्यवेक्षिका, आरोग्य कर्मचारी, पशुचिकित्सा कर्मचारी, कनिष्ठ अभियंता, स्थापत्य अभियात्रिकी सहाय्यक आदी १९ संवर्गावर सहाव्या आणि सातव्या वेतन आयोगाकडून अन्याय होत आहे. तो तो दूर करण्यात यावा अशी विनंती शिक्षक संघटनेने केली आहे.

मागील संपामध्ये वेतन त्रुटी दूर करावी ही एक प्रमुख मागणी घेऊन आंदोलन करण्यात आले होते या बेमुदत संपामध्ये सहभाग घेतल्याने राज्याचे माजी अप्पर मुख्य सचिव मुकेश खुलर यांच्या अध्यक्षतेखाली वेतन त्रुटी समिती स्थापन करण्यात आली. दि. २ ऑगस्ट रोजी राज्याचे अध्यक्ष बलराज मगर यांच्या म ार्गदर्शनाखाली बाबुराव पूजरवाड, राज्य सरचिटणीस विवेक लिंगराज, कोषाध्यक्ष विजयकुमार हळदे, संपर्क सचिव रामचंद्र मडके यांच्या नेतृत्वाखालील समितीने मंत्रालयात १०९ कागदपत्रांसह वेतन त्रुटी समितीसमोर एक तास आपली साक्ष नोंदवली. त्या अनुषंगाने वरील संवर्गावर वेतनांमध्ये वेतन आयोगाने सातत्याने अन्याय केला आहे तो दूर करण्यात यावी अशी विनंती यावेळी करण्यात आली.

## तुळशी येथे घरातून चोरी

**टेंभूर्णी :** तुळशी (ता.माढा) येथे राहणाऱ्या वैभव चव्हाण यांच्या उघडया घरात प्रवेश करून चोरट्याने कपाटातील रोख रकमेसह १ लाख ९० हजार रुपये किमतीचे दागिने पळवले. ही चोरी गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली. यासंदर्भात वैभव गोपाल चव्हाण (रा. वरवडेरोड तुळशी ता.माढा ) यांनी टेंभुर्णी पोलिसात फिर्याद दाखल केली. ते आपल्या घराच्या दरवाजा पुढे करून बसले होते. सायंकाळी ५ वाजेच्या सुमारास अनोळखी चोरटा दरवाजा ढकलून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील १ लाख ९० हजार रुपये रोख, आणि १० ग्राम सोन्याचे दागिने चोरून नेले.

## आ. देशमुख यांच्या निधीतून रस्ते विकासकामाचा शुभारंभ

### रस्त्यांसाठी मिळाला ४० लाखांचा निधी



सोलापूर : रस्ते विकासकामाच्या शुभारंभप्रसंगी आ. विजय देशमुख यांच्यासह प्रा. नारायण बनसोडे, अमर पुदाले, ज्ञानेश्वर कारभारी व इतर.

सोलापूर/प्रतिनिधी

माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख यांच्या विशेष निधीतून सोलापूर शहर उत्तर मतदारसंघातील प्रभाग क्रमांक २ मध्ये विविध योजनेअंतर्गत ४० लाख रुपयांच्या निधीतून कॉंक्रीटीकरण रस्ते कामाचा शुभारंभ आमदार विजयकुमार देशमुख यांच्या हस्ते करण्यात आला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय विकास २०२३ - २४ योजनेअंतर्गत राजराजेश्वरी नगर येथील राष्ट्रीय महामार्ग स्वाद हॉटेल कॉर्नर ते निर्मल विहार गेटपर्यंत रस्ता कॉंक्रीटीकरण ३० लक्ष रुपये व सोलापूर महानगरपालिका मूलभूत सोयीसुविधा २०२३ २४ योजनेअंतर्गत दहिटणे येथील लक्ष्मी नगर मधील अंतर्गत कॉंक्रीटीकरण रस्ता १० लाख रुपये निधीतून होणाऱ्या कॉंक्रीटीकरण रस्ते विकासकामाचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी माजी पालकमंत्री आमदार विजयकुमार देशमुख, भाजयुमो शहराध्यक्ष किरण देशमुख, भाजपा सरचिटणीस प्रा. नारायण बनसोडे, अमर पुदाले, ज्ञानेश्वर कारभारी, शंकर शिंदे, विरेश उंबरजे, सतिश महाले, तानाजी गव्हाणे, महादेव जतकर, दयानंद मंठाळकर आदींची व्यासपिठावर उपस्थिती होती.

> शहर उत्तर विधानसभेच्या सर्वांगीण विकासासाठी निधीची कमतरता भासू देणार नाही. नागरिकांना दिलेल्या विकासाचा आश्वासनाची पूर्तता करणार आहोत.
>
> –**विजयकुमार देशमुख**, आमदार

## चिखली येथे शेतकऱ्याचे घर फोडले

**मोहोळ :** भर दिवसा शेतकऱ्याच्या बंद घराचे कुलूप तोडून चोरट्याने रोख रकमेसह २ लाख ६५ हजार रुपये किमतीचे दागिने पळवले.

**रोख रकमेसह २ लाख ६५ हजारांचे दागिने लंपास**

ही चोरी चिखली (ता.मोहोळ) येथे गुरुवारी सायंकाळच्या सुमारास उघडकीस आली . यासंदर्भात धर्मराज महादेव पाटील (रा. चिखली )या वृद्ध शेतकऱ्यांनी मोहोळ पोलीसात फिर्याद दाखल केली . ते गुरुवारी सकाळच्या सुम ारास शेतातील घराला कुलूप लावून बाहेर गेले होते. सायंकाळी परतल्यानंतर त्यांना चोरी झाल्याचे दिसून आले. चोरट्यानी त्यांच्या घरातील दरवाजाचा कडी कोयंडा आणि कुलूप तोडून घरात प्रवेश केला. आणि कपाटातील १ लाख १७ हजार रुपये, रोख ३५ ग्रॅम सोन्याचे दागिने आणि चांदीची नाणी आदी २ लाख ६५ हजार रुपये किमतीचा ऐवज घेऊन पोबारा केला.

## शहरातून बेपत्ता झालेल्या १४४ व्यक्तींचा शोधून काढण्यात पोलिसांना यश

### कुटुंबियांनी मानले आभार : सात दिवसांची राबवली विशेष शोध मोहीम

सोलापूर/प्रतिनिधी

बेपत्ता लोकांना शोधून सुरक्षित घरात आणण्यासाठी सोलापूर आयुक्तालय हद्दीतील सात पोलीस ठाण्याकडील सात पथके व अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाकडील एक पथक असे एकूण आठ पथके तयार करून अवघ्या सात दिवसात १४४ बेपत्ता लोकांना शोधून त्यांच्या कुटुंबियाकडे सोपविण्यात आले.



सोलापूर पोलीस आयुक्तालय अंतर्गत पोलीस तपासात हरवलेल्या पुरुष महिलांनी मुलांचा शोध घेण्यासाठी पोलीस आयुक्त एम राजकुमार यांनी पोलीस ठाणे स्तरावर विशेष मोहीम राबविण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार सातही पोलीस ठाण्याच्या विशेष पथकाने विशेष शोध मोहीम राबवून शहरातून बेपत्ता व्यक्तींचा शोध घेतला. यामध्ये ७६ महिला, ६२ पुरुष, ६ बालकांचा समावेश आहे. त्यांचा शोध घेऊन त्यांना नातेवाईकांच्या ताब्यात दिल्याने नातेवाईकांनी पोलिसांची आभार मानले.

ही शोध मोहीम २५ ते ३१ राबविण्यात आली. यापूर्वी डिसेंबर २०२३ ते अद्याप पर्यंत बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यासाठी विशेष शोध मोहीम राबवून एकूण ६६३ बेपत्ता व्यक्तींचा शोध घेण्यात आलेला आहे. विशेष शोध मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करणाऱ्या सर्व पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी अभिनंदन केले आहे.

### पोलीस ठाण्याने केलेली कार्यवाही

फौजदार चावडी पोलीस ठाणे– २६, सदर बाजार पोलिस ठाणे– ९, विजापूर नाका पोलीस ठाणे २४, सलगर वस्ती पोलीस ठाणे ३, एमआयडीसी पोलीस ठाणे १७, जोडभावी पेठ पोलीस ठाणे २८, अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष ३१.